| Divisional Dy. Director Of Education Office, Near Bhadkal Gate, Miepa Building, Aurangabad-431 001. | सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन | विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, भडकल गेटजवळ, मीपा इमारत, औरंगाबाद-४३१ ००१. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|---|

दूरध्वनी क्र.०२४०-२९७०३७४, E-mail id:rmsadydeaurangabad@gmail.com, Website:www.dydeabad.in

जा.क्र.शिउसं/औ/मावि-१/स्वयंअर्थ/शाळा परवानगी/२०२२-२३/1787 दिनांक : 22 FEB 2023

**शाळा परवानगी (इरादा पत्र)**

प्रति,
शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली.

**विषय :-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक:एसएफएस-१०१९/प्र.क्र.५६७/एसएम-२, दि.०५/०९/२०१९.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.शिउसंऔ/मावि-१/२०१९-२०/१५५४०, दि.२२/११/२०१९.
३. आपले पत्र क्र.जिपहिं/शिविमा/कावि/९७३/२०२२, दि.०६/०७/२०२२.

उपरोक्त विषयास असनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई** संचलित **पोदार इंटरनॅशनल स्कूल, पळशी रोड, सिध्दार्थ नगर जवळ, हिंगोली** या इंग्रजी माध्यमाच्या नवीन **प्राथमिक ते उच्च माध्यमिक** शाळेस **स्वयंअर्थसहाय्यित** तत्त्वावर सन **२०१९-२०** या शैक्षणिक वर्षापासून संदर्भ क्र. १ अन्वये शासन स्तरावरुन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर शाळेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | माध्यम | मंडळ संलग्नता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई** | पोदार इंटरनॅशनल स्कूल, पळशी रोड, सिध्दार्थ नगर जवळ, हिंगोली | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा) | इंग्रजी | सीबीएसई |

प्रकरणी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर उक्त नमुद शाळेस खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

१. संस्थेने प्रस्तुत शाळेसाठी सादर केलेला भाडेकरार सन २०१४ मधील असून सदर भाडेकरार संस्थेने इतर शाळांसाठी वापरलेला नाही, याबाबतची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांनी करावी. तसेच संस्थेने प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरु केली नसल्याची संबंधित शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांनी खात्री करावी. तथापि, सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सदर शाळेकडून रु. १ लाख इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल शासनास व या कार्यालयास सादर करावा.

२. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांची / तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३. शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन **२०१९-२०** या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी (इरादापत्र)** देण्यात येत आहे:-

कृ.मा.प.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन **२०१९-२०** करिता संदर्भिय शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन संदर्भिय शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

४. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

५. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

७. **यु-डायस डाटा :-** संदर्भिय शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, **'स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त शाळा'** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरिता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

८. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

**सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षणाधिकारी यांची राहील.**

Principal
Podar International School,
Hingoli

Manager
Podar International School
Hingoli.

(अनिल साबळे)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१. मा. आयुक्त(शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
६. मा. कार्यासन अधिकारी, (एसएम-२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली.
२. अध्यक्ष/सचिव, **पोदार एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई.**